# शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड

विरसावरकर मार्ग, बाबा नगर, नांदेड 431 602

दुरध्वनी कमांक 02462 254210फक्स 02462 252520

Email : govtpolynanded @yahoo.com


जा.क्र.शातंनिनां /आस्था 02 /2018/ 4500

दिनांक :– 6 DEC 2018

## निविदा सुचना

प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,नांदेड हे या संस्थेच्या सुरक्षा रक्षक सेवा पुरविण्याच्या कामी एजन्सी निवड करण्यासाठी दोन लिफाफे पध्दतीने मोहरबंद निविदा मागवित आहेत.

निविदा भरण्यासाठी सुरक्षा रक्षक सेवा मान्यता प्राप्त,नोंदणीकृत,परवाना धारक रोजगार स्वयंरोजगार संस्था,सहकारी किंवा सुरक्षा रक्षक सेवा मंडळ,खाजगी परवाना धारक एजन्सी यांचे कडून सदरील निवीदा अपेक्षित आहेत.

सोबत जोडलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सदरील निवीदा मागविण्यात येत आहेत.

## निविदे संदर्भात विवरण खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| 1.निविदेची एकुण मुल्य अंदाजे (अकरा महिन्याच्या कालावधीसाठी) | रूपये 1200000 /– (अक्षरी बारा लाख फक्त) |
| 2.सुरक्षा अनामत | रूपये 25000 /– (अक्षरी पंचविस हजार फक्त) |
| 3.को–या निविदेची किंमत | रूपये 1000 /– (अक्षरी एक हजार फक्त) |
| 4.निवड पश्चात भरावयाचे डिपॉजीट | रूपये 60,000 /– (अक्षरी साठ हजार फक्त) |

5.पत्ता –

प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड, विरसावरकर मार्ग, बाबानगर, नांदेड 431 602, ( महाराष्ट्र )
दुरध्वनीकमांक 02462 254210

## महत्वाच्या तारखा

| | | |
|---|---|---|
| 01.को–या निविदा प्रत्यक्ष संस्थेतून विकत घेणे | दि.18/12/2018 ते दि.27/12/2018 | दुपारी 03 पर्यंत |
| 02.निविदा मोहरबंद स्वरूपात स्विकारणे | दि.18/12/2018 ते दि.27/12/2018 | सायं 5 पर्यंत |
| 03.निविदा प्राचार्य कक्षात उघडणे | दि. 28/12/2018 | सकाळी 11 वाजता |

GOVT.POLYTECHNIC NANDED

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,नांदेड

**Principal**
**Govt.Polytechnic,Nanded**

प्रत–01. महाराष्ट्र शासन वेबसाईट
02 संस्थेचे सुचना फलक
03 संस्थेची वेबसाईट वर समन्वयक यांना संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी
04 को–या निविदा संबंधीतांना

सोबत जोडावयाची कागदपत्र (सर्व self attested)

## तांत्रिक लिफाफा (लिफाफा कमांक –1) मोहर बंद

1.निविदा किंमत रूपये 1000/– अक्षरी एक हजार ची पावती क. व पावतीची छायांकीत प्रत

2.EMD Rs -25000/-DD प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांच्या नावे नांदेड येथे देय राष्ट्रियकृत बॅकेचा डीडी (डीडीच्या पाठीमागे आपल्या संस्थेचे नाव लिहावे )

3.मागील 03 वर्षाच्या आयकर रिटर्न च्या प्रती

4. GST नोंदणी कमांक

5.सुरक्षा रक्षक सेवा नोंदणी कमांक /परवाना

6.संस्थेची EFF नोंदणी कमांक, ESIC इत्यादी

7.संचालक मंडळाचे आधार कार्ड खाजगी संस्था असल्यास मालकाचे ओळखपत्र

8.मागील तीन वर्षाचे बॅक स्टेटमेंन्ट,वार्षीक उलाढाल तपासण्यासाठी (वार्षीक किमान 25 लाख कमाल मर्यादा आहे.)

9.पोलीस उपमहानिरीक्षक परीक्षेत्र नांदेड /जिल्हा पोलीस अधिक्षक,नांदेड याचे प्रमाणपत्र सुरक्षा रक्षक सेवा एजन्सी म्हणुन मान्यता.

10.पॅनकार्ड प्रत

11.अनुभव प्रमाणपत्र

12.निविदा धारकास आवश्यक वाटते असे इतर काही प्रमाणपत्र,कागदपत्र वरील पैकी नसलेले असल्यास जोडावे.

GOVT. POLYTECHNIC NANDED

Principal
Govt.Polytechnic,Nanded

# प्रति सुरक्षा रक्षक वेतन व भत्ते (लिफाफा कमांक –2 )

वाणिज्य ( Commercial) लिफाफा मोहर बंद

| अ.क | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| 01 | किमान वेतन प्रचलित कायदयानुसार | |
| 02 | Special Allowance / DA | |
| 03 | HRA. | |
| 04 | .Conveyance Allowance | |
| 05 | .Washing Allowance | |
| 06 | .Educational Allowance | |
| 07 | .Relieving Charges | |
| 08 | .Employar Contribution of ESI | |
| 09 | . Employar Contribution of EPF | |
| 10 | .Any Other Charges | |
| 11 | .Agency Charges | |
| 12 | .GST | |
| 13 | इतर काही | |
| | एकुण वेतन आकडयात | |
| | एकुण वेतन अक्षरी | |

स्वाक्षरी :–

नाव :–

हुदा:–

एजन्सीचा शिक्का:–

असे सविस्तर महाराष्ट्र राज्य कामगार आयुक्तांनी ठरविलेल्या किमान वेतन व इतर कायद्या प्रमाणे लागु देय भत्ते याचे सविस्तर रक्कम लिहुन आपल्या संस्थेच्या /एजन्सीच्या ॲथोराईझड पदाधिका–यांच्या स्वाक्षरी / रबरी सील सह लिहीलेला कागद मोहर बंद लिफाफा इतर काही कयद्यानुसार देय Levy चा उल्लेख करावयाचा असल्यास समाविष्ठ करावा.

GOVT. POLYTECHNIC NANDED

Principal
Govt.Polytechnic,Nanded

**शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड या संस्थेसाठी वर्ष 2018–19 सुरक्षा रक्षक पुरवठा सेवेसाठी एजन्सीची निवड करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.**

## निविदा धारकांसाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

1.निविदा धारक एजन्सीकडे सुरक्षा रक्षक सेवा पुरविण्यासाठी वैध नोंदणी/परवाना महाराष्ट्र शासन /केंद्र शासन मान्यता प्राप्त असणे आवश्यक.

2.सदरील नोंदणी परवाना निविदा उघडण्याच्या वेळेपर्यंत तसेच ठेका कालावधी साठी वैध असणे आवश्यक.

3.ठेका कालावधी अकरा महिण्याचा असेल व आपली सेवा समाधान कारक नसल्यास एक महिण्याची अगावू सूचना देवून ठेका रदद करण्यात येईल तसेच आपणास काही कारणाने ठेका रद्द करावयाचा झाल्यास एक महिण्याची अगावू सुचना द्यावी लागेल.

4.सुरक्षा रक्षकाचे वय अठरा वर्षा पेक्षा कमी व साठ वर्षा पेक्षा जास्त असू नये. तसेच शारिरिक क्षमता ,उंची किमान 170 सेमी,वजन उंचीच्या प्रमाणात वैदकीय मानकाप्रमाणे. छाती 81 सेमी न फुगवता व 85 सेमी फुगवून असावी.

5.निविदा धारक एजन्सीला भूतकाळात तसेच सेवा देत असताना कोणत्याही शासकीय संस्थेने काळया यादीत टाकलेले नसावे.या बाबत संस्थेने (एजन्सीने) स्वतः माहिती देणे आवश्यक राहील.जर अशा काळया यादीत समाविष्ट असल्याचे आढळल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

6.निविदा धारक एजन्सीची मागील तीन वर्षाची वार्षिक आर्थिक उलाढाल रुपये 25 लाखापेक्षा कमी असू नये.

7.निविदा धारक एजन्सीकडे सुरक्षा रक्षक सेवा पुरविण्याच्या कामाचा किमान 03 वर्षाचा अनुभव असावा.

8.निविदा धारक एजन्सीकडे वैधानिक अटी जसे की इ.एस.आय,प्रॉव्हिडंट फंड,वस्तु व सेवाकर, आयकर पॅनकार्ड,संचालक मंडळाचे पदाधिका–यांचे आधारकार्ड ,संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र,परवाना,नांदेड परिक्षेत्र पोलिस उपमहानिरिक्षक यांचे सुरक्षा रक्षक सेवा बाबतचे प्रमाणपत्र असणे आवश्यक

9.निविदा धारक एजन्सीने निविदा भरली म्हणजे आपणास सर्व अटी व शर्ती समजल्या व मान्य आहेत असे मानले जाईल व आपल्या एजन्सीची निवड झाल्यास आपणास या अटी व शर्ती रु 100/–च्या बंधपत्रावर लिहुन नोटरी करुन द्यावे लागेल.

10.सुरक्षा अनामत रक्कम रु 25000/– पंचवीस हजार फक्त राष्ट्रीयकृत बॅकेचा डी डी स्वरुपात प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांचे नावे व पेयेबेल ॲट नांदेड असा असावा.

GOVT. POLYTECHNIC NANDED

Principal
Govt.Polytechnic,Nanded

4/8

11.को–या ,निविदेची रक्कम रु 1000/– एक हजार फक्त ; ना परतावा असेल.ही रक्कम रोखीने रोखपाल यांचेकडे भरुन कोरी निविदा दिलेल्या तारखे व वेळे पर्यंत खरेदी करता येईल.

12.आपल्या एजन्सीची निविदा मंजुर झाल्यास आपणास बंधपत्र देवून व गॅरंटी रक्कम रु 600000/–साठ हजार फक्त रोख अथवा डि.डि.स्वरुपात संस्थेत भरावी लागेल.आपण डि.डि. स्वरुपात भरलेली सुरक्षा अनामत या रक्कमेमध्ये ॲडजस्ट करता येईल.दि. 01.01. 2019 पासुन काम सुरु करावे लागेल.

13.ज्या निविदा धारकांची निविदा मंजुर होणार नाही त्यांना सुरक्षा अनामत म्हणून जमा केलेला डि.डि.रु 25000/– चा परत मिळेल.

14.शासनाकडून काही कारणाने निधी उपलब्ध होण्यास विलंब झाल्यास त्या बाबत अग्रिम देण्यात येणार नाही तेंव्हा किमान 2 ते 3 महिने आपण नेमलेल्या सुरक्षा रक्षकाचे वेतन दर महिण्याच्या 5 तारखेपर्यंत संबधितास अदा करणे निविदा धारक एजन्सीची जबाबदारी राहीन व या बाबत ऐजन्सी आर्थिकदृष्टया सक्षम असने गरजेचे आहे.

15. सुरक्षा रक्षक ऐजन्सीला या संस्थेस दररोज नेमुन दिलेल्या बिंदु व त्या अंतर्गत चा परिसर या सुरक्षेसाठी तीन पाळयांमध्ये सुरक्षा रक्षक पुरवावे लागतील.प्रति दिवस किमान 12 सुरक्षा रक्षक लागतील.संस्थेच्या गरजेनूसार सुरक्षा रक्षकाच्या संख्यमध्ये थोडा फार बदल होउ शकतो.

–संस्थेत काही कार्यक्रमानिमीत्य अधिकचे सुरक्षा रक्षक लागतील.संस्थेच्या गरजेनूसार त्यामध्ये थोडीफार कमी अधिक संख्या होवू शकते.

–संस्थेत काही कार्यक्रमानिमीत्य अधिकचे सुरक्षा रक्षक लागत असल्यास नियीमत दरामध्येच अशी सेवा देणे आवश्यक

– सकाळी 8 ते सायं 4 प्रथम, दुपारी 4 ते रात्री 12 द्वितीय,रात्री 12 ते सकाळी 8 तृतीयपाळी राहील.

किमान 8 तास डयुटी बंधनकारक असेल.सुरक्षा राउंड दी क्लॉक 24 तासांसाठी द्यावी लागेल.

16.सुरक्षा रक्षकाचे कामाचे दिवस 26 असतील.साप्ताहीक पगारी सुटटी लागु असेल तसेच किमान वेतन कायद्यानुसार वेतन व इतर अनुषंगिक भत्ते सुरक्षा रक्षकास मिळतील हे सुरक्षारक्षक पुरवठादार एजन्सीने सुनिश्चीत करावे या संबधाने सर्व कायदेशीर जबाबदारी एजन्सीची असेल.

17.सुरक्षा रक्षक एजन्सीन या संस्थेतील मालमत्ता, अधिकारी ,कर्मचारी,विद्यार्थी/विद्यार्थ्यींनी यांच्या रक्षणाची/सुरक्षेची संपुर्ण जबाबदारी राहील कोणत्याही अप्रिय घटना प्रसंगी जसे की चोरी,मारामारी,डकैती ई.सुरक्षारक्षक एजन्सीने या संस्थेच्या समन्वय अधिकारी कुलमंत्री ,संस्थाप्रमुख यांच्या परवानगीने पोलीसात तक्रार देणे, संबधित गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करणे व इतर अनुषंगिक कायदेशीर कार्यवाहीत जबाबदारी घेणे आवश्यक व या बाबत सुरक्षारक्षक प्रशिक्षीत असणे आवश्यक.

18.नैसर्गिक आपत्ती भूकंप,अपघात,विद्यार्थ्यांमध्ये भांडण,संस्थेबाहेरील व्यक्तीनी दहशत माजविल्यास सुरक्षा रक्षकांना व एजन्सीस जबाबदारी स्विकारावी लागेल.

GOVT. POLYTECHNIC NANDED

Principal
Govt.Polytechnic,Nanded

19.एजन्सीने नेमलेल्या एकुण सुरक्षा रक्षकांपैकी एक सुरक्षारक्षक संस्था प्रशासनाशी सुरक्षा रक्षक सेवे बाबत स्वतःचे काम सांभाळून समन्वयाचे काम पाहिल.एजन्सीने पुरेसा अनुभव असलेला सुरक्षा रक्षकाचे समन्वयासाठी नाव द्यावयाचे आहे.

20.संस्थेचे प्राचार्य ,उपप्राचार्य ,कुलमंत्री ,शिस्तपालन समिती प्रमुख यांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन वेळोवेळी करण्यात यावे.

21.एजन्सीने पुरविलेल्या सुरक्षा रक्षक कर्मचा–यावर पोलीस रेकॉर्डवर दखलपात्र गुन्हा नसावा. तसेच चारित्र्य पडताळणी अहवाल /प्रमाणपत्र प्रत्येकाचे देणे बंधनकारक असेल.

22.संस्थेत चोरी,इतर सुरक्षा विषयक कारणांमुळे झालेले नुकसान याची जबाबदारी सुरक्षा रक्षक पुरवठादार एजन्सीची राहील.

23.कोणतीही निविदा कोणत्याही कारणांशिवाय स्विकारणे अथवा नाकारणे बाबत चे अंतीम अधिकार प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड सुरक्षीत ठेवत आहेत.

24.सुरक्षा रक्षकास एजन्सीने शिटटी ,काठी,गणवेश,रेनकोट,छत्री,टॉर्च,,थंडीमध्ये स्वेटर ई. पुरवावे लागेल.सुरक्षा रक्षक योग्य गणवेशात नसल्यास रु 500/– चा दंड एजन्सीस आकारण्यात येईल.

25.सुरक्षा रक्षकांच्या वेतन,भत्ते ई बाबत तसेच वैयक्तीक तक्रारी,कायदेशीर अडचणी दुर करण्याची जबाबदारी सुरक्षा रक्षक पुरवठा एजन्सीची राहील.

26.कागदपत्र सादर करण्यास कोणतीही मुदतवाढ किंवा सवलत दिली जाणार नाही.

27.लेबर ॲक्ट 1970, मिनिमम वेजेस ॲक्ट 1948, पेमेंट ऑफ ग्रॅज्युइटी ॲक्ट 1942 चे पालन सुरक्षारक्षक पुरवठादार एजन्सीने जबाबदारीने करावे

28. निविदा पुर्णतः,अंशतः,विभागुन देणे किंवा नाकारणे किंवा कालावधी कमी करणे हे हक्क ,प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड राखुन ठेवत आहेत.

29.कार्यआदेश दिल्यानंतर कामगार परवाना काढण्याची जबाबदारी ऐजन्सीची राहील.

सदरील निविदा www.gpnanded.org.in व www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सुचना प्रकाशित करण्यात आलेली आहे.प्रत्यक्ष को–या निविदा संस्थेत घेवुन विहीत वेळेत भरता येईल.कालावधी दि.18.12.18.ते 27.12.18

उपरोक्त सर्व अटी व शर्ती अं.क. 01 ते 29 मान्य आहेत.

स्वाक्षरीः–
नाव :–
हुदा :–
एजन्सीचा शिक्का :–

Principal
Govt.Polytechnic,Nanded

GOVT.POLYTECHNIC NANDED

**उपरोक्त अटी व शर्ती सोबतच सुरक्षा रक्षक ऐजन्सी,सुरक्षा रक्षक यांची कर्तव्य व जबाबदारी खालीलप्रमाणे असतील.एजन्सीने आपल्या सुरक्षा रक्षकास अवगत करावे.**

1.सुरक्षा रक्षक पुरवठादार एजन्सी या संस्थेच्या म्हणजेच शासकीय तंत्रनिकेतन,नांदेड संपुर्ण सुरक्षा व्यवस्थेसाठी जबाबदार असेल.

2.सुरक्षा रक्षकास या संस्थेने एजन्सीला दिलेल्या निर्देशानुसार कर्तव्य जबाबदारी समजून घेउन कुशलतेने व गांभिर्याने सर्व सेवा पार पाडणे आवश्यक.

3.सुरक्षा रक्षकाने या संस्थेमधून कोणतीही व्यक्ती,स्वतः किंवा वाहनाद्वारे कोणतीही वस्तू नेत असेल तर गेट पास तपासून /खात्री करुन,रजिस्टर मध्ये नोंद करुन तसेच गेट पास ची एक प्रत घेवूनच बाहेर नेउ द्यावी अन्य कोणत्याही मार्गाने वस्तु बाहेर नेण्यास प्रतिबंध आहे हे लक्षात घ्यावे.

4.सुरक्षा रक्षकास नेमून दिलेला पॉईंट म्हणजे लगतचा आसपासचा परिसर देखिल असून नेमका परिसर समजून घेवून दिवस/रात्र फेरी घेवून सुरक्षा वि ायक देखरेख ठेवावी विशेषतः महत्त्वाच्या तसेच संवेदनशिल भाग समजुन त्यावर विशे ा लक्ष द्यावे.

5.सुरक्षा रक्षकास संस्था परिसरातील दिवाबत्ती योग्य वेळी लावणे ,बंद करणे,परिसरातील झाडे, फूलझाडे,लॉन इत्यादी चे रक्षण करणे, इमारतीचे कॉरिडॉरमधील चॅनेल गेट,मुख्य प्रवेशद्वार चालु करणे,बंद करणे तसेच पाण्याचा अपव्यय तोटी चालु असल्यामुळे होत असल्यास नळाच्या तोटया,व्हॉल्व्ह बंद करणे अशी कामे करावी लागतील.

6.सुरक्षा रक्षकाने संस्थेत येणा–या वाहनांना शिस्तीत पार्किंगसाठी वाहन चालकांना योग्य निर्देश,मार्ग दाखविणे आवश्यक. तसेच विद्यार्थी/कर्मचारी/अधिकारी यांना देखील पार्कीग बाबत दिशानिर्देश देत रहाने आवश्यक.

7.संस्था परिसरात कुत्रे ,गाई ,म्हशी ,गाढव ,डुक्कर ई प्राण्यांना न येवू देणे व आल्यास त्यांना बाहेर घालविणे आवश्यक.

8.सुरक्षा रक्षकास अग्निशमन यंत्र हाताळता येणे आवश्यक तसेच आपत्ती व्यवस्थापन बाबत पुरेसे किमान प्रशिक्षण असने आवश्यक.

9.सुरक्षा रक्षकाने परिपक्व व सौजन्याने वागणे आवश्यक विशेषतः विद्यार्थिनी ,महिला कर्मचारी , वरिष्ठ व्यक्ती ,वृध्द यांच्या बाबत वर्तणुक चांगली हवी.

10.सुरक्षा रक्षकास डयुटी संपल्यावर बदली कर्मचारी कामावर आल्यावरच नेमूण दिलेला पॉईंट सोडता येईल.

11.सुरक्षा रक्षकाने संस्थेचे कर्मचारी,त्रयस्थ व्यक्ती,विद्यार्थी यांना गोळा करुन गप्पा मारत बसू नये.

12.सुरक्षा रक्षकाने संस्थेत पेट्रोलिंग साठी पोलिस अधिकारी/कर्मचारी संस्थेत आल्यास त्यांना योग्य ते सहकार्य करावे लागेल व पेट्रोलिंग ची नोंद रजिस्टर मध्ये ठेवावी.

GOVT. POLYTECHNIC NANDED

Principal
Govt.Polytechnic,Nanded

13.संस्थेत येणा–या अनोळखी व्यक्ती वाहने चौकशी करुन व रजिस्टर मध्ये नोंद घेवूनच आत मध्ये सोडावे.

14.सुरक्षा रक्षकास विडी,सिगारेट,गुटखा,तंबाखु,दारु तसेच इतर कोणत्याही प्रकारची नशा करता येणार नाही व असे आढळल्यास एजन्सीमार्फत निलंबन/सेवेतून काढणे अशी कार्यवाही करणे आवश्यक.

15.सुरक्षारक्षक पुरवठादार ऐजन्सीने सुरक्षा रक्षकांच्या तक्रारी हाताळायच्या असल्यामुळे सुरक्षारक्षकानी कॉलेज प्रशासनास ऐजन्सीच्या आखत्यारीतील प्रश्नांबाबत तगादा लावू नये.

16.डयुटीवर असताना सुरक्षा रक्षकाचा अपघात ,नैसर्गिक कारणाने अपंगत्व,मृत्यु ई बाबतीत काही अप्रिय घटना दुर्देवाने घडल्यास त्या संबधी विमा संरक्षण,नुकसान भरपाई ई.बाबत कायदेशीर जबाबदारी सुरक्षा रक्षक पुरवठा एजन्सीची राहिल हे सुरक्षा रक्षकाने लक्षात घ्यावे.

उपरोक्त सर्व अटी/शर्ती ,जबाबदारी व कर्तव्य इत्यादी सुरक्षारक्षक पुरवठा एजन्सी म्हणून पुर्णपणे समजल्या असून सर्व मान्य करुनच निविदा भरत आहेत.

स्वाक्षरीः–

नाव :–

हुदा :–

एजन्सीचा शिक्का :–

GOVT. POLYTECHNIC NANDED

Principal
Govt.Polytechnic,Nanded